ePaper

TMC पक्षाच्या भवितव्यावरून दोन्ही गटांमध्ये दावे-प्रतिदावे; ममता समर्थकांची कोंडी



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 17 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...


प्रलंबित मागण्यांसाठी आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप

## 'अल निनो' च्या संकटाने राज्यात दुष्काळाचे सावट..?

# महाराष्ट्रात मान्सूनने फिरवली पाठ..!

**महाईन्यूज । रत्नागिरी**

**कोकणात नैऋत्य मान्सूनचे आगमन होऊनही अपेक्षित दमदार पावसाने अद्याप हजेरी लावलेली नाही. भारतीय हवामान विभागाने पुढील काही दिवस कोकण-गोव्यात तुरळक ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त केला असून काही ठिकाणी मेघगर्जनेसह ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवली आहे.**









दरम्यान, रत्नागिरी जिल्ह्यातील १५ जूनपर्यंतच्या पर्जन्यमानाच्या आकडेवारीने चिंताजनक चित्र समोर आणले आहे. यंदा जिल्ह्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल ७८ टक्क्यांहून अधिक पावसाची तूट नोंदवली गेली आहे.

हवामान विभागाच्या १४ जूनच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, महाराष्ट्रात मान्सूनच्या पुढील प्रगतीसाठी वातावरण अनुकूल असून येत्या चार ते पाच दिवसांत राज्यातील आणखी काही भागांमध्ये मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. १४ ते २० जूनदरम्यान कोकण-गोव्यात विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित असून १४ आणि १६ जून रोजी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे. तसेच १४ ते १७ जूनदरम्यान उष्ण व दमट हवामान कायम राहण्याची शक्यता आहे.

## महाबोधच्या नोंदीतही तुटीचेच चित्र





महाराष्ट्र शासनाच्या महाबोध पर्जन्यमान नोंदीनुसार, १ ते १५ जूनदरम्यान जिल्ह्यात ७२४.२० मिमी पाऊस झाला असून तो वार्षिक सरासरीच्या केवळ २.३९ टक्के इतका आहे. रत्नागिरी तालुक्यात १५५.४० मिमी, राजापूरमध्ये १४५.६० मिमी आणि गुहागरमध्ये १०८.१० मिमी पावसाची नोंद झाली. मंडणगडमध्ये १७.४० मिमी तर खेडमध्ये फक्त १२.१० मिमी पाऊस झाला.

## १५ दिवसांत केवळ ५९८ मिमी पाऊस



रत्नागिरी जिल्हा प्रशासनाच्या अहवालानुसार, १५ जून रोजी जिल्ह्यात केवळ १.२१ मिमी पावसाची नोंद झाली. १ ते १५ जून या कालावधीत जिल्ह्यात एकूण ५९८.९४ मिमी पाऊस झाला असून तो वार्षिक सरासरीच्या अवघ्या १.९८ टक्के इतकाच आहे. तालुकानिहाय आकडेवारीत रत्नागिरी तालुक्यात सर्वाधिक १५९.८५ मिमी, तर गुहागरमध्ये १४२.२० मिमी पावसाची नोंद झाली. दुसरीकडे मंडणगडमध्ये केवळ ८.७५ मिमी, खेडमध्ये २१.३१ मिमी आणि दापोलीत २८.२४ मिमी पाऊस झाला आहे.

## गेल्या वर्षीच्या तुलनेत मोठी घसरण


१५ जून २०२५ पर्यंत जिल्ह्यात २७१३.९५ मिमी पावसाची नोंद झाली होती. मात्र यंदा त्याच कालावधीत केवळ ५९८.९४ मिमी पाऊस झाला आहे. म्हणजेच पावसात सुमारे ७८ टक्क्यांपेक्षा अधिक घट झाली आहे. गेल्या वर्षी या कालावधीत वार्षिक सरासरीच्या ८.९६ टक्के पाऊस झाला होता, तर यंदा हा आकडा अवघ्या १.९८ टक्क्यांवर आला आहे. तालुकानिहाय तुलनेत दापोली, लांजा, गुहागर आणि रत्नागिरी तालुक्यांतही पावसात लक्षणीय घट दिसून येत आहे. त्यामुळे मान्सूनची यंदाची सुरुवात संथ आणि निराशाजनक ठरत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# महापालिका शाळांच्या गुणवत्तेसाठी महापौरांचा पुढाकार!

## शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी व्यापक नियोजन; विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यावर भर

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या शाळांतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी पुणे महापालिकेने पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. शहरातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळावे यासाठी पुणे महापालिकेच्या वतीने शहरातील विविध भागात शाळा सुरू करण्यात आले आहेत. या शाळांमध्ये गरीब आणि झोपडपट्टी मध्ये राहणारी मुले प्रामुख्याने शिक्षणासाठी येतात.**



शहरातील कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी महापालिका प्रत्येक विद्यार्थ्याच्या मागे वर्षाला हजारो रुपयांचा निधी खर्च करते. दरवर्षी कोट्यावधीने रूपांच्या निधी खर्च करू नये महापालिका शाळेतील गुणवत्ता सुधारत नसल्याचे समोर आले आहे. यामध्ये आता महापौर लक्ष घालणार आहेत. महापौर मंजूषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट स्थापन केला जाणार आहे. या अभ्यास गटाकडून येणाऱ्या सूचनेनुसार महापालिकेच्या इतर शाळांत त्याची अंमलबजावणी केली जाईल.

महापौरांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या या गटात शिक्षणातील तज्ज्ञ असणार आहेत. हा अभ्यास गट शाळांच्या गुणवत्तेसंदर्भात अहवाल सादर करणार असल्याचे सभागृह नेते गणेश बीडकर यांनी सांगितले. दरम्यान, महापालिकेच्या पाच इंग्रजी माध्यमांच्या शाळा चालविणाऱ्या 'आकांक्षा फाऊंडेशन' या संस्थेला वर्षाला सुमारे बारा कोटी रुपये दिले जाणार आहेत. पुढील तीन वर्षांसाठी या संस्थेबरोबर करार केला जाणार असल्याचे बीडकर यांनी सांगितले. महापालिकेच्या पाच इंग्रजी माध्यम शाळा पुढील नऊ वर्षांसाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर चालविण्याचा प्रस्ताव गेल्या आठवड्यात महापालिका प्रशासनाने पुढे आणला होता. यासाठी सुमारे १०१.२५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. मात्र, हा प्रस्ताव शिक्षण समितीसमोर न आणता थेट स्थायी समितीकडे पाठविण्यात आला होता. त्यामुळे स्थायी समितीने या प्रस्तावावर फेरविचार करून शिक्षण समितीच्या मार्फत हा प्रस्ताव सादर करण्याची सूचना केली.

यावर सभागृह नेते बीडकर यांनी पत्रकार परिषद घेऊन सोमवारी भूमिका मांडली. बीडकर म्हणाले, 'संबंधित संस्थेला महापालिकेच्या शाळा नऊ वर्षांसाठी नव्हे, तर तीन वर्षांसाठी चालविण्यासाठी दिल्या जाणार आहेत. यापूर्वी ही संस्था 'सीएसआर'च्या निधीतून महापालिकेच्या शाळा चालवीत होती. सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे.

'सीएसआर'मधून हा खर्च परवडत नसल्याने महापालिकेने यासाठी वाटा उचलावा, अशी मागणी केली जात होती. संस्थेच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता चांगली असून, उत्तीर्ण होण्याचे प्रमाण हे ९० टक्के इतके आहे. विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी झाले आहे.' पालक, शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ यांच्या सूचनांचाही अभ्यास गट विचार करणार असल्याचे सांगण्यात आले. शिक्षण क्षेत्रात दीर्घकालीन आणि परिणामकारक बदल घडवून आणण्यासाठी टप्प्याटप्प्याने सुधारणा करण्याची तयारी सुरू आहे.


### शिक्षकांचे प्रशिक्षण, डिजिटल शिक्षण आणि मूलभूत सुविधा

महापालिका शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी हा अभ्यास गट विविध बाबींचा सखोल अभ्यास करणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच शिक्षकांचे प्रशिक्षण, डिजिटल शिक्षण आणि मूलभूत सुविधांचाही आढावा घेतला जाणार आहे. प्रत्येक शाळेतील गुणवत्तेतील तफावत ओळखून त्यानुसार सुधारणा आराखडा तयार केला जाईल. विद्यार्थ्यांची उपस्थिती, गळतीचे प्रमाण आणि निकाल यांचे विश्लेषण करून आवश्यक उपाययोजना सुचविल्या जाणार आहेत. खासगी संस्थांच्या यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून ते महापालिकेच्या इतर शाळांमध्येही राबविण्याचा विचार आहे.

# खासगी प्रवासी गाड्यांमुळे पुणेकरांची 'कोंडी'; ट्रॅव्हल्समुळे वाहतूकीचा खोळंबा

**महाईन्यूज । पुणे**

**परवानगी नसतानाही खासगी प्रवासी गाड्या रस्त्यांवर तासन् तास उभ्या राहत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. या गाड्या रस्त्याचा अर्ध्याहून अधिक भाग व्यापून थांबत असल्याने शहराच्या वेगवेगळ्या भागांत वाहतूक कोंडीत भर पडत असून, अपघातांचा धोका वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.**








खासगी प्रवासी गाड्यांना शहरात कोणत्याही ठिकाणी थांबण्याची परवानगी नाही. त्यांना शहराबाहेर संगमवाडी, वाकड, कात्रज अशा काही नाक्यांवर थांबे देण्यात आले आहेत. मात्र, पुण्यातून बाहेर जाणाऱ्या विविध रस्ते-नाक्यांवर स्वारगेट, लक्ष्मीनारायण टॉकीजसमोर, कात्रज चौक, वाकड, जहांगीर रुग्णालय परिसरात रात्रीच्या वेळी आणि सुट्ट्यांच्या दिवशी शेकडो खासगी प्रवासी गाड्या रस्त्याच्या कडेला तासन् तास उभ्या राहिलेल्या दिसतात. शहराच्या मध्यवर्ती भागात, स्वारगेट, शिवाजीनगर, कर्वेनगर परिसरातही या गाड्या उभ्या असतात.

प्रवासी गाड्या आकाराने मोठ्या असतात. त्या रस्त्याचा अर्ध्याहून अधिक भाग व्यापतात. त्यामुळे आधीच अरुंद असलेले रस्ते आक्रसतात. परिणामी, वाहतूक कोंडीत मोठी भर पडत असल्याचे चित्र आहे. तसेच, या बस वर्दळीच्या ठिकाणी अधे-मधे थांबत असल्याने अपघातांचा धोकाही मोठ्या प्रमाणात वाढतो. वाहतूक पोलिसांकडूनही या प्रकाराकडे अनेकदा दुर्लक्ष होत असल्याचे दिसते.

> शहरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता खासगी प्रवासी वाहनांसाठी स्वतंत्र व नियोजित थांबे निश्चित करणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या अनेक खासगी प्रवासी गाड्या रस्त्याच्या मध्यभागी किंवा अनधिकृत ठिकाणी थांबत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. परिणामी अशा वाहनांवर नो-पार्किंग अंतर्गत दंडात्मक कारवाई केली जाते. प्रवाशांच्या सोयीसाठी खासगी प्रवासी वाहनांनाही अधिकृत थांबे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर चालकांनीही केवळ निर्धारित थांब्यांवरच प्रवासी चढवणे-उतरणे याचे काटेकोर पालन करावे.
>
> - स्वप्निल भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी.

### वाहतूक कोंडीची समस्या कायम राहणार

खासगी प्रवासी गाड्यांना थांबा नेमून देणे गरजेचे आहे. वाहतूक पोलिसांनी नेमून दिलेल्या थांब्यांवरच गाड्यांनी थांबणे बंधनकारक आहे. त्यानुसारच आमच्या गाड्या थांबतात. खासगी प्रवासी गाड्या शहरात कुठेही थांबल्या नाहीत, तरीही वाहतूक कोंडीची समस्या कायम राहणार आहे. ज्या गाड्या अधे-मधे थांबत असतील, त्यांच्यावर दंडात्मक आणि ऑनलाइन संकेतस्थळावरून काढून टाकण्याची कारवाई करण्यात येते, असे नसरमदा ट्रॅवलचे जगदीश स्वामी यांचे म्हणणे आहे.

# प्रलंबित मागण्यांसाठी आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप

## वाहन नोंदणी, परवाने, कर वसुलीसह अनेक सेवा प्रभावित होण्याची शक्यता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रलंबित मागण्यांकडे शासन व प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ राज्यभरातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी आजपासून (ता. १६) बेमुदत संप पुकारला आहे. या संपाचा परिणाम पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कामकाजावर होणार असून वाहन नोंदणी, वाहन परवाने, कर वसुली तसेच इतर महत्त्वाच्या सेवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.**




आरटीओ कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, आकृतीबंध मंजूर होऊन साडेतीन वर्षांहून अधिक कालावधी लोटला असला तरी सेवा प्रवेश नियम अद्याप तयार करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधींपासून वंचित राहावे लागत असून आर्थिक व सामाजिक नुकसान सहन करावे लागत आहे. तसेच इतर अनेक प्रलंबित प्रश्नांबाबतही प्रशासनाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये आहे.

संघटनेने विविध मागण्यांसाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करूनही प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या प्रक्रियेत वेळकाढूपणा करण्यात आल्याचा आरोप संघटनेकडून करण्यात आला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

दरम्यान, आंदोलनाची नोटीस दिल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दहा दिवसांपूर्वी बैठक आयोजित केली होती. मात्र, या बैठकीचे इतिवृत्त अद्याप उपलब्ध करून देण्यात आले नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचा संताप अधिक वाढल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

१३ जून रोजी झालेल्या संघटनेच्या बैठकीत संपाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावेळी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बेमुदत संपाशिवाय अन्य पर्याय नसल्याचे मत व्यक्त केले. त्यानुसार आजपासून राज्यभरातील आरटीओ कर्मचारी संपावर गेले आहेत.

या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडमधील वाहनधारक, वाहन विक्रेते व नागरिकांना विविध आरटीओ सेवांसाठी अडचणींचा सामना करावा लागू शकतो. शासनाने प्रलंबित मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनेचे सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी दिला आहे.

### आरटीओच्या 'या' सेवा ठप्प होण्याची शक्यता

वाहन नोंदणी, ड्रायव्हिंग लायसन्स प्रक्रिया, वाहन हस्तांतरण, कर भरणा, फिटनेस प्रमाणपत्र, परवाना नूतनीकरण तसेच इतर प्रशासकीय कामांवर आरटीओ कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कामांचे नियोजन करूनच आरटीओ कार्यालयात भेट द्यावी.

# इंद्रायणी नदीत उडी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न; विवाहितेचे प्राण वाचले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अज्ञात कारणातून आलेल्या नैराश्यामुळे देहू येथील भैरवनाथ चौक पुलावरून इंद्रायणी नदीत उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या विवाहितेचे प्राण वाचवण्यात 'पुणे महानगर प्रदेश आपत्कालीन प्रतिसाद दल' (पीडीआरएफ) आणि पोलिसांना यश आले. सोमवारी (दि. १५) सकाळी पावणेसातच्या सुमारास ही घटना घडली.**



पुष्पा सुरेश गाडे (रा. चव्हाणनगर, देहूगाव) असे या विवाहितेचे नाव असून त्यांच्यावर पिंपरीतील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सोमवारी सकाळी ६.४५ वाजता माणिक जाधव यांनी पोलिस नियंत्रण कक्षाला फोन करून एका महिलेने भैरवनाथ चौक पुलावरून इंद्रायणी नदीत उडी मारल्याची माहिती दिली.

माहिती मिळताच देहूगाव बीट मार्शलचे पोलिस अंमलदार भोये आणि सुरवसे घटनास्थळी दाखल झाले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तत्काळ पीएमआरडीएच्या मारुंजी येथील पीडीआरएफ पथकाला पाचारण केले. त्यानंतर पीडीआरएफचे जवान, पोलिस कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी संयुक्तपणे नदीपात्रात शोधमोहीम सुरू केली.

अथक प्रयत्नांनंतर महिलेला पाण्यातून सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. जवान आणि पोलिसांनी तिला खासगी रुग्णवाहिकेद्वारे तातडीने वायसीएम रुग्णालयात दाखल केले. वेळेत उपचार मिळाल्याने महिला शुद्धीवर आली असून तिची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

दरम्यान, पोलिसांनी या घटनेची माहिती महिलेचे पती सुरेश केशव गाडे आणि भाऊ राजेंद्र गायकवाड यांना दिली. वायसीएम रुग्णालयात दाखल केल्यानंतर महिलेवर तातडीने उपचार करण्यात आले. योग्य वेळी मदत आणि उपचार मिळाल्यामुळे तिचे प्राण वाचल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. या संपूर्ण बचावकार्यात पीडीआरएफ जवानांनी दाखविलेल्या तत्परतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### वेळेवर मदत मिळाल्याने टळली दुर्घटना

भैरवनाथ चौक पुलावरून नदीत उडी घेतलेल्या महिलेला पीडीआरएफ जवान, पोलिस आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने बाहेर काढले. त्यानंतर वायसीएम रुग्णालयात वेळेत उपचार मिळाल्याने तिचे प्राण वाचले असून प्रकृती स्थिर आहे.



## भूमिका

**भारतीय राजकारणात गेल्या काही वर्षांत विरोधकांची भूमिका अनेकदा विस्कळीत आणि दिशाहीन दिसून आली आहे. केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका करण्यापलीकडे पर्यायी राजकीय मांडणी फारशी दिसत नव्हती. मात्र अलीकडे नीति आयोगाच्या बैठकीत दक्षिण भारतातील चार प्रभावी नेते एकत्र आल्याने राष्ट्रीय राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे.**

# दक्षिणेच्या चौकडीने बदलले राजकारणाचे गणित



केरळचे व्ही. डी. सतीशन, तेलंगणाचे रेवंथ रेड्डी, कर्नाटकचे डी. के. शिवकुमार आणि तामिळनाडूचे जोसेफ विजय यांनी दाखविलेली एकजूट ही केवळ प्रतीकात्मक नव्हती; तर संघराज्याच्या प्रश्नांवर दक्षिणेकडील राज्यांचा सामूहिक आवाज म्हणून ती समोर आली.

दक्षिण भारतातील ही चार राज्ये देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देतात. औद्योगिक विकास, शिक्षण, आरोग्य, माहिती-तंत्रज्ञान आणि निर्यात या क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय प्रगती साधली आहे. देशाच्या जीडीपीत आणि कर महसुलात त्यांचा मोठा वाटा आहे. तरीही लोकसंख्या नियंत्रणात यश मिळविलेल्या या राज्यांना भविष्यात लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेमुळे प्रतिनिधित्व कमी होण्याची भीती वाटते. याच मुद्द्यावर त्यांनी केंद्राचे लक्ष वेधले.

रेवंथ रेड्डी यांनी मांडलेले सूत्र विशेष लक्षवेधी आहे. लोकसभेतील काही जागा लोकसंख्येच्या आधारे तर काही आर्थिक योगदानाच्या आधारे वाटप करण्याचा विचार त्यांनी मांडला. यामुळे विकासात आघाडीवर असलेल्या राज्यांना न्याय मिळू शकतो, असा त्यांचा युक्तिवाद आहे. हा विषय केवळ राजकीय नसून संघराज्य व्यवस्थेच्या समतोलाशी संबंधित असल्याने त्याचे महत्त्व अधिक आहे.

या चौघांच्या नेतृत्वातही विविधता दिसते. सतीशन यांची स्वच्छ प्रतिमा आणि वैचारिक भक्कमपणा, शिवकुमार यांचे संघटन कौशल्य, रेवंथ रेड्डी यांची आक्रमक राजकीय शैली आणि विजय यांची लोकप्रियता यामुळे हा गट अधिक प्रभावी ठरू शकतो. त्यांच्या वैयक्तिक ताकदी एकत्र आल्यास दक्षिण भारतात एक मजबूत राजकीय व्यासपीठ उभे राहू शकते.

भाजपसाठी ही परिस्थिती आव्हानात्मक आहे. कर्नाटक वगळता दक्षिणेतील बहुतांश राज्यांत भाजपला अपेक्षित यश मिळालेले नाही. अशा वेळी दक्षिणेकडील राज्यांचा समन्वित गट तयार झाला तर तो राष्ट्रीय राजकारणात प्रभावी दबावगट ठरू शकतो. विशेषतः मतदारसंघ पुनर्रचना, आर्थिक वाटप आणि राज्यांच्या अधिकारांसारख्या प्रश्नांवर हा गट केंद्राला कठोर भूमिका घेण्यास भाग पाडू शकतो.

अर्थात, या चौघांचे ऐक्य दीर्घकाळ टिकणे आणि ते निवडणुकीतील यशात रूपांतरित होणे ही मोठी कसोटी असेल. प्रादेशिक हितसंबंध आणि पक्षीय राजकारण यांमध्ये समन्वय राखणे सोपे नाही. तरीही त्यांनी दिलेला संदेश स्पष्ट आहे—दक्षिणेकडील राज्ये आता केवळ मागण्या करणारी नव्हेत, तर राष्ट्रीय धोरणनिर्मितीत निर्णायक भूमिका बजावण्यास तयार आहेत. त्यामुळे ही ‘दक्षिणी चौकडी’ भविष्यात भारतीय राजकारणातील महत्त्वाची शक्ती ठरू शकते आणि भाजपसाठी नक्कीच डोकेदुखी वाढवू शकते.

## प्रासंगिक »

### शिकण्याची वृत्ती

**सिद्ध हार्मोनियम वादक गोविंदराव टेंबे यांच्या बाबतीत घडलेली कथा. एकदा त्यांच्या घरासमोर एक भिकारी येऊन गाऊ लागला. गोविंदरावांना त्याचे गाणे भिडले.**

त्या भिकाऱ्याच्या आवाजातील दर्द आणि फिरत मोठी मजेदार व कौतुकास्पद वाटली. त्यांनी त्याला घरात बोलाविले. चांगले दोन तास गायला लावले. भिकार्यालाही दर्दी श्रोता मिळाला. त्याचे गाणे रंगतच गेले. जणू दोघांची मैफिल जमली होती. या काळात गोविंदरावांनी त्याच्या गाण्यातील हरकत जाणून घेतल्या. स्वतः त्या गाऊन पहिल्या.

पेटीवर वाजवून पहिल्या. नंतर त्या भिकाऱ्याला पोटभर जेवायला घातले. चांगले कपडे दिले व पाच रुपये त्याच्या हातावर ठेवले. तो भिकारी गोविंरावांना दुवा देत निघून गेला. एवढे लौकीकवान गोविंदराव टेंबे, पण त्यांनी सामान्य भिकाऱ्याकडून काही शिकण्यात कमीपणा मानला नाही. मग ते कोणाकडूनही मिळो, ते घेण्याची वृत्ती हवी.

- तात्पर्य : सावध चिते शोधावे । शोधोनी अचूक वाचावे । वेचोनी उपयोगावे । ज्ञान काही।

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे त्यांच्या अनिश्चित आणि लहरी निर्णयशैलीसाठी ओळखले जातात. त्यामुळे इराणबरोबरच्या नव्या शांतता कराराच्या घोषणेकडे जगाने आशावाद आणि संशय या दोन्ही नजरेतून पाहणे स्वाभाविक आहे.**

# ट्रम्पांच्या लहरी निर्णयांवर किती विश्वास ठेवायचा?

पश्चिम आशियात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा करार तात्पुरता दिलासा देणारा असला, तरी दीर्घकालीन शांततेची हमी देणारा नाही.

इराण-अमेरिका संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील व्यापार धोक्यात आला होता. जगातील मोठ्या प्रमाणावरील तेलवाहतूक या मार्गाने होत असल्याने त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर झाला. आता युद्धविरामाच्या घोषणेनंतर होर्मुझ पुन्हा खुली होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या किमती घसरल्या असून जागतिक शेअर बाजारांनीही सकारात्मक प्रतिक्रिया दिली आहे. भारतासारख्या तेल आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसाठी ही बाब निश्चितच दिलासादायक आहे.

मात्र, या कराराकडे वास्तववादी दृष्टीने पाहण्याची गरज आहे. कारण ट्रम्प यांचा इतिहास अशा करारांबाबत फारसा विश्वासार्ह राहिलेला नाही.



२०१५ मधील इराण अणुकरार त्यांनी २०१८ मध्ये एकतर्फी रद्द केला होता. दबाव निर्माण करणे, निर्बंध लादणे आणि नंतर अचानक समझोता जाहीर करणे ही त्यांची कार्यपद्धती राहिली आहे. त्यामुळे आजचा करार उद्याही कायम राहील, याची शाश्वती देता येत नाही.

या करारातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे इराणच्या अणुकार्यक्रमाचा प्रश्न अद्याप पूर्णपणे निकाली निघालेला नाही. युद्धविरामामुळे संघर्ष थांबू शकतो; परंतु मूळ वाद कायम राहिल्यास भविष्यात पुन्हा तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पश्चिम आशियातील अस्थिरता पूर्णपणे संपुष्टात आली आहे, असे मानणे घाईचे ठरेल.

भारतासाठी या घडामोडींमधील सर्वात महत्त्वाचा धडा म्हणजे ऊर्जा सुरक्षिततेचा. आंतरराष्ट्रीय संकटांचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. तेलाचे दर वाढले की महागाई वाढते, उद्योगांवर ताण येतो आणि सामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त भार पडतो. त्यामुळे अशा जागतिक संकटांपासून अर्थव्यवस्थेला संरक्षण देण्यासाठी पर्यायी ऊर्जा स्रोत, साठवण क्षमता आणि दीर्घकालीन नियोजन यांवर भर देणे आवश्यक आहे.

ट्रम्प यांच्या घोषणेने सध्या दिलासा मिळाला असला, तरी जागतिक राजकारणातील अनिश्चितता अद्याप कायम आहे. म्हणूनच भारतासह जगातील सर्व देशांनी उत्साहापेक्षा सावधगिरीला प्राधान्य देणे आणि भविष्यातील संकटांसाठी सज्ज राहणे हीच काळाची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



परपुरुषाचें सुख भोगे तरी ।
उतरोनि करीं घ्यावें सीस ॥१॥

संवसारा आगी आपुलेनि हातें ।
लावूनि मागुतें पाहूं नये ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अभिजीत दीपकेची नागपूरात मोठी घोषणा

## कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजित दीपके यांच्यावर जयपूर येथील आंदोलनात हल्ला

महाईन्यूज । नागपूर

**कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांच्यावर जयपूर येथील आंदोलनात झालेल्या हल्लानंतरही आपण मागे हटणार नाही या भूमिकेवर ठाम राहत दिपके नागपुरात आले आहेत. त्यांना वाढत प्रतिसाद बघता कॉक्रोच जनता पार्टीचे राजकीय पक्षात रुपांतर होणार का? असा प्रश्न अनेकांकडून विचारला जातो. तसेच, केंद्र सरकारच्या विरोधात भूमिका घेणारी कॉक्रोच जनता पार्टी मोदी सरकारचा राजकीय पक्ष म्हणून सामना करणार का? असाही प्रश्न अनेकांना पडतो.**




राजकीय पक्ष उभारण्याबाबत त्यांनी स्पष्ट केलेली भूमिका अनेकांना आश्चर्याचा धक्का देणारी आहे. नागपूरमधील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

परीक्षांमध्ये होणारे घोटाळे, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि जबाबदारीची उणीव यामुळे देशाचे अतोनात नुकसान होत असून शिक्षणमंत्र्यांनी राजनीमा न दिल्यास देशातील वेगवेगळ्या शहरांमध्ये शांततामय मार्गांनी आंदोलन करण्यात येईल, असे दीपके यांनी सांगितले. पुण्यानंतर, लखनऊ, जयपूर, बंगळुरू, नागपूर अशा शहरांमध्येही कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन होईल. तरीही राजीनामा न दिल्यास येत्या २० जून रोजी दिल्लीत संपूर्ण देशभरातील विद्यार्थी एकत्र येऊन केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागितला जाणार आहे. राजीनामा घेतल्याशिवाय माघार घेणार नाही असेही दीपके म्हणाले.

विद्यार्थ्यांची जबाबदारी घेण्यासाठी आम्हाला राजकारणात उतरावे लागत असेल तर ही खेदाची गोष्ट आहे. प्रत्येक व्यक्ती राजकीय पक्ष काढू शकत नाही. प्रत्येकाला राजकारणात यावे लागत असेल तर ज्यांना निवडून दिले ते काय करत आहेत. उद्या काहीही समस्या आली तर प्रत्येक व्यक्ती राजकीय पक्ष काढणार आहे का?. राजकीय पक्षांवरील विश्वास ढासळत चालल्यामुळे नव्या लोकांनी समोर यावे अशी मागणी होते. देशात प्रत्येक ठिकाणी हिंदू-मुस्लीम राजकारण केले जाते. यातून कुणालाच फायदा होत नाही. समस्येसाठी प्रत्येकाला राजकारणात उतरावे लागत असेल तर ही शक्य नाही. अशी वेळच देशातील तरुणांवर यायला नको, असेही दीपके म्हणाले.

नेपाळ आणि श्रीलंकेच्या आंदोलनाबाबत अभिजीत दीपके यांनी स्पष्ट मत मांडले होते. त्यांनी भारत आणि शेजारील देशांतील परिस्थितीची तुलना नाकारली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, भारतीय तरुणांची तुलना नेपाळ किंवा बांगलादेशमधील आंदोलनांशी करणे हा भारतीय तरुणांचा अपमान आहे. भारतीय तरुण अधिक सुशिक्षित आणि राजकीयदृष्ट्या जागरूक आहेत. ते म्हणाले की, भारतात तरुणांचे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण, लोकशाही मार्गाने आणि संविधानाच्या चौकटीत राहील. भाजपकडून आमच्यावर राष्ट्रद्रोही असा आरोप केला जातो. त्यामुळे या देशात केवळ भाजपचे लोकच राष्ट्रप्रेमी आहेत का, असा प्रश्नही दीपके यांनी सांगितले.

### आंदोलक गरीब राहावे ही भूमिका बदला

आम्हाला पैशांची मदत केली जाते असा आरोप करणे चुकीचे आहे. मी विदेशा शिकून आलो आणि विमानाचे तिकीट काढून फिरू शकते इतकी माझी आर्थिक परिस्थिती आहे. समाजसेवा करणाऱ्यांनी गरीब राहावे, सगळ्या गोष्टींचा त्याग करावा, ही भूमिका बदलावी लागेल. बदनाम करणाऱ्यांनीच आणीबाणीच्या विरोधात आंदोलन केले. हा लोकशाही देश आहे. आंदोनातूनच हा देश उभा झाला आहे. लोकशाही टीकवण्यासाठी आंदोलन झाले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विद्यार्थ्यांच्या मनातली गोष्टी ऐकून पाहायला हवी. मोदींना पंतप्रधान बनून ४००० हजार दिवस झाले. परंतु, त्यांच्या काळात चार पेपरही पारदर्शक पद्धतीने झाले नाही असाही आरोप त्यांनी केला.

# महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भूंकप! उद्धव ठाकरेंना मोठा झटका

महाईन्यूज । मुंबई

**शिवसेना पक्ष फुटीच्या धक्क्यातून सावरलेल्या उद्धव ठाकरे यांना आणखी एक मोठा धक्का बसणार आहे. २०२४ मध्ये निवडून आलेले पक्षाचे ९ पैकी ७ खासदार ठाकरेंची साथ सोडणार आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात तिसऱ्यांदा राजकीय भूकंप होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नऊपैकी सात खासदार साथ सोडणार असून, यापैकी दोन खासदार दिल्लीतही पोहोचले आहेत.**



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे सात खासदार पक्षातून बाहेर पडल्यानंतर वेगळा गट तयार करणार आहेत आणि हा गट नंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत हा गट सामील होणार होणार आहे.

राज्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कथित ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू असतानाच शिंदेसेनेतील आमदाराने एक खळबळजनक दावा केला. ठाकरे गटातील १६ आमदारांसह ७ खासदार शिंदेसेनेत येतील, असे आमदार कृपाल तुमाने यांनी म्हटले आहे. ऑपरेशन टायगर पूर्ण झाले असून आता फक्त तारीख बाकी आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी एबीपी माझाशी बोलताना दिली आहे. दुसरीकडे- ठाकरे गटाकडून हा दावा फेटाळून लावण्यात आला आहे. दरम्यान, ऑपरेशन टायगरची जोरदार चर्चा सुरू असतानाच माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी खासदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला ९ पैकी ५ खासदारांनी ऑनलाईन उपस्थिती दर्शवली. ठाकरे गटाचे प्रभावशाली नेते संजय राऊत यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना त्यामागील कारणेही स्पष्ट केली होती. तरीदेखील ठाकरेंचे आमदार आणि खासदार हे आमच्या संपर्कात असल्याचा दावा शिंदे गटातील नेत्यांकडून केला जात आहे.

### उद्धव ठाकरेंचे दोन खासदार दिल्लीत पोहोचले

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शिर्डी मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौर आणि यवतमाळचे खासदार संजय देशमुख दिल्लीत पोहोचले आहेत. त्याचबरोबर इतर पाच खासदार आज (१६ जून) रात्री दिल्लीत पोहोचणार आहेत. शिवसेनेचा ६०वा वर्धापन दिवस १९ जून रोजी होत आहे आणि त्यापूर्वीच हे खासदार एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत सामील होण्याची शक्यता आहे.

### कोणते खासदार सोडणार ठाकरेंची साथ?

आजतकच्या रिपोर्टनुसार, जे खासदार बंडखोरी करून बाहेर पडणार आहेत, त्यात अरविंद सावंत, संजय जाधव, संजय पाटील, नागेश बापूराव आष्टीकर, ओमप्रकाश राजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे आणि संजय देशमुख यांचा समावेश आहे. दरम्यान, पक्षात होत असलेली ही मोठी फूट रोखण्यासाठी खासदार अनिल देसाई आणि खासदार संजय राऊत हे दिल्लीत आहेत.

# टेलिग्राम बंदीवरून केंद्र सरकारवर निशाणा!

## सरकारच्या या निर्णयामुळे देशातील १५ कोटींहून अधिक सामान्य युजर्स त्रस्त

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतात NEET परीक्षेच्या पार्श्वभूमीवर टेलिग्राम या लोकप्रिय मेसेजिंग ॲपवर घालण्यात आलेल्या आठवड्याभराच्या बंदीवर कंपनीचे संस्थापक, मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पावेल दुरोव्ह यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. "सरकारच्या या निर्णयामुळे देशातील १५ कोटींहून अधिक सामान्य युजर्सना नाहक त्रास सहन करावा लागत आहे," असा दावा दुरोव्ह यांनी केला आहे. तसेच, "बंदी घालून पेपर लीक थांबलेले नाही, तर ते आता इतर ॲप्सवर सुरू झाले आहे," असा टोलाही त्यांनी लगावला.**




पावेल दुरोव्ह यांनी 'X' (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर करत भारतीय माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या (IT Ministry) या कारवाईवर बोट ठेवले आहे.

"भारतात काही युजर्सनी परीक्षेचे लीक झालेले पेपर्स शेअर केले, म्हणून सरकारने टेलिग्रामवर एका आठवड्याची बंदी घातली. हा निर्णय म्हणजे देशातील १५ कोटींपेक्षा जास्त सामान्य टेलिग्राम युजर्सना शिक्षा देण्यासारखा आहे. ज्यांनी प्रत्यक्षात पेपर लीक केले, त्यांच्यावर याचा काहीही परिणाम झालेला नाही. या बंदीमुळे मूळ समस्या सुटलेली नाही, कारण पेपर लीकचे हे रॅकेट आता इतर ॲप्सवर शिफ्ट झाले आहे," असे दुरोव्ह यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

देशात वैद्यकीय प्रवेशासाठी होणाऱ्या 'NEET UG 2026' परीक्षेच्या घोळानंतर केंद्र सरकारने सुरक्षेचा उपाय म्हणून टेलिग्रामवर तात्पुरती बंदी घातली आहे. २१ जून रोजी होणाऱ्या नीटच्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली असून, २२ जूनपर्यंत ही बंदी कायम राहणार आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (NTA) शिफारशीवरून माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे. दरम्यान, या तात्पुरत्या बंदीमुळे कोट्यवधी युजर्सची गैरसोय होत असल्याबद्दल 'एनटीए'ने दिलगिरी व्यक्त केली आहे.

फक्त बंदीच नाही, तर सरकारने टेलिग्रामला ३० जूनपर्यंत त्यांचे अत्यंत लोकप्रिय असलेले 'मेसेज एडिटिंग' (Message-Editing) फीचर भारतात पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. २१ जून रोजी होणाऱ्या नीट पुनर्परिक्षेमध्ये कोणत्याही प्रकारची गडबड होऊ नये म्हणून सरकारने हे कडक पाऊल उचलले आहे. टेलिग्रामवर सक्रिय असलेल्या विविध टोळ्या (Cheating Rackets) परीक्षार्थींना खोटे पेपर देऊन त्यांची फसवणूक करत असल्याचे समोर आले होते.

यापूर्वी प्रशासनाने टेलिग्रामवरील अनेक संशयास्पद चॅनेल्स, ग्रुप्स आणि बॉट्स (Bots) डिलीट केले होते. मात्र, तरीही हे प्रकार थांबत नसल्याने अखेर संपूर्ण प्लॅटफॉर्मवरच तात्पुरती बंदी घालण्याचा टोकाचा निर्णय सरकारला घ्यावा लागला. दरम्यान, इंटरनेटवरील अशा तात्पुरत्या बंदीमुळे मूळ समस्येचे निवारण होते की नाही, यावर आता डिजिटल विश्वात एक नवी चर्चा सुरू झाली आहे.

### व्हॉट्सॲपवर बंदी का नाही?

व्हॉट्सॲपवर कोणतीही बंदी घातलेली नाही, हे जाणून घेण्यासाठी आधी टेलिग्रामवर काय चालते, हे समजून घ्यावे लागेल. एनटीएने दिलेल्या माहितीनुसार, Paper Leaked Neet, Re-Neet 2026 आणि Private Mafia यासारखे टेलिग्राम चॅनेल नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्याची उघडपणे जाहिरात करत होते. या बदल्यात उमेदवारांकडून लाखो रुपयांची मागणी केली जात होती. टेलिग्रामवरील अनेक चॅनेल आणि ग्रुप्स बंद करण्यासह इतर काही युक्त्या वापरूनही पेपरफुटीच्या अफवा कायम राहिल्या. त्यामुळे एनटीएने या ॲपवरच बंदी घालण्याची शिफारस केली.

## TMC पक्षाच्या भवितव्यावरून दोन्ही गटांमध्ये दावे-प्रतिदावे; ममता समर्थकांची कोंडी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**तृणमूल काँग्रेससमोरील राजकीय संकट अधिक तीव्र झाले असतानाच, ममता बॅनर्जी यांच्या समर्थकांची कोंडी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. लोकसभेत बंडखोर गटांना नॅशनालिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया (एनसीपीआय) या पक्षात सामावून घेण्याच्या हालचाली सुरू आहेत.**



दुसरीकडे, ममता बॅनर्जी यांचा भाचा आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांना मंगळवारी सलग तिसऱ्या दिवशी तपास यंत्रणेसमोर चौकशीसाठी हजर राहावे लागले. विधानसभेतही ममतानिष्ठ आमदारांना डावलण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

विधानसभा निवडणूक प्रचाराच्या वेळी कथितरित्या प्रक्षोभक विधाने केल्याच्या आरोपावरून तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांची कोलकात्यात राज्य पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) सुमारे चौकशी केली. अभिषेक यांची रविवारी सीआयडीने विरोधी पक्षनेत्याच्या नियुक्तीसंबंधी कागदपत्रांवर आमदारांच्या बनावट सह्या घेतल्याच्या आरोपांवरून साडेआठ तास चौकशी केली होती. तर राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीमध्ये घोटाळा झाल्याप्रकरणी चौकशीसाठी 'ईडी'ने सोमवारी ११ तास चौकशी केली.

दरम्यान, पक्षाच्या बंडखोर खासदारांच्या गटाने आपल्याला २२ खासदारांचा पाठिंबा मिळू शकतो असे सूचित केले आहे. पक्षाच्या दोन्ही गटांनी एकमेकांची वैधता, नेतृत्व आणि भवितव्य यावरून प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दुसरीकडे, 'नॅशनालिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया' (एनसीपीआय) हा पक्ष आमच्या खासदारांना स्वीकारण्यास तयार असल्याचे बंडखोर गटाच्या नेत्या काकोली घोष दस्तीदार यांनी सांगितले.

संसदेच्या आवारात पत्रकारांशी बोलताना दस्तीदार म्हणाल्या, "आम्हाला स्वीकृतीची संमती आधीच मिळाली आहे. आमचे खासदार घेण्यात ते (एनसीपीआय) आनंदी आहेत. आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली रालोआबरोबर काम करू." बंगालमधील बंडखोर आमदारांबद्दल बोलताना दस्तीदार यांनी स्पष्ट केले की, बंडखोर खासदारांचा राज्य विधानसभा सदस्यांशी काही संबंध नाही.

### बंडखोरांचा उल्लेख गद्दार

काकोली दस्तीदार यांनी सध्या आपल्याकडे २० खासदार असले तरी ही संख्या २२पर्यंत जाऊ शकते, असा दावा केला. तृणमूल काँग्रेसचे एकूण २८ खासदार आहेत. मात्र, ममता बॅनर्जी यांचे नेतृत्व मानणाऱ्या गटाने बंडखोरांचा उल्लेख गद्दार असा केला. "आमच्या नेत्या ममतादीदी आहेत, गद्दारांचे नेते नरेंद्र मोदी आहेत," अशी टीका पक्षाचे ज्येष्ठ नेते सौगत रॉय यांनी केली. या वेगवान घडामोडींदरम्यान 'एनसीपीआय'ने ज्योतीप्रकाश चॅटर्जी यांची अध्यक्षपदी निवड केल्याची माहिती दस्तीदार यांनी दिली.

# मी कान्समध्ये का गेले?



सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आणि 'बिग बॉस'मुळे घराघरात पोहोचलेली 'कोकण हार्टेड गर्ल' अंकिता प्रभू वालावलकर नुकतीच 'कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६'मध्ये सहभागी झाली होती. या कार्यक्रमात तिने महाराष्ट्राची संस्कृती आणि मराठी भाषेचं जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व केलं. मात्र, कान्समध्ये सहभागी झाल्यानंतर काही सोशल मीडिया वापरकर्त्यांनी तिला ट्रोल करण्यास सुरुवात केली. या ट्रोलर्सना अंकिताने आता स्पष्ट आणि सडेतोड उत्तर दिलं आहे. यावर्षी ७९ वा कान्स फिल्म फेस्टिव्हल (Cannes Film Festival) पार पडला. या सोहळ्यात भारतातील अनेक कलाकार, अभिनेत्री, मॉडेल्स आणि इन्फ्लुएन्सर्स सहभागी झाले होते. विशेष म्हणजे मराठी कलाकारांनीही यावेळी दिमाखदार उपस्थिती लावली. अभिनेते अशोक सराफ, अभिनेत्री निवेदिता सराफ, प्राजक्ता माळी, जयंती वाघधरे आणि अंकिता प्रभू वालावलकर यांनी महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व केलं. अंकिताने या सोहळ्यात गुलाबी रंगाचा पैठणी शैलीतील गाऊन परिधान केला होता. तिच्या या पारंपरिक आणि आधुनिक लूकचं सोशल मीडियावर मोठं कौतुक झालं. अनेक चाहत्यांनी तिचं अभिनंदन केलं. मात्र, काही जणांनी 'कान्स हा फिल्म फेस्टिव्हल आहे, मग एका इन्फ्लुएन्सरचं तिथे काय काम?' असा प्रश्न उपस्थित करत तिला ट्रोल केलं. या टीकेला उत्तर देताना अंकिताने स्पष्ट केलं की, अनेकांना कान्स फेस्टिव्हलबद्दल पुरेशी माहिती नसते. केवळ नावात 'फिल्म फेस्टिव्हल' असलं तरी हा कार्यक्रम फक्त चित्रपटांपुरता मर्यादित नाही. एका मुलाखतीत अंकिता म्हणाली की, कान्समध्ये मोठ्या प्रमाणावर ग्लोबल नेटवर्किंग आणि ब्रँडिंग केलं जातं. तिथे केवळ कलाकारच नसतात, तर अनेक आंतरराष्ट्रीय ब्रँड्स, सौंदर्यप्रसाधन कंपन्या, मोबाईल कंपन्या आणि विविध क्षेत्रांतील प्रतिनिधीही सहभागी होतात. हे ब्रँड्स कार्यक्रमाचे प्रायोजकही असतात आणि त्यांचं प्रमोशनही तिथे केलं जातं. अंकिताने पुढे सांगितलं की, ती तिथे मराठी भाषेचं आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचं प्रतिनिधित्व करण्यासाठी गेली होती. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा संदेश जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा उद्देशही त्यामागे होता.




## राजकुमार हिरानींचे OTTवर पदार्पण

दिग्दर्शक राजकुमार हिरानी (Rajkumar Hirani) आता ओटीटी विश्वात पदार्पण करत आहेत. अविनाश अरुण दिग्दर्शित 'प्रीतम अँड पेड्रो' या आगामी वेबसीरिजची त्यांनी निर्मिती केली आहे. या सीरिजचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीस आला असून, त्याने प्रेक्षकांची उत्सुकता कमालीची वाढवली आहे. या सीरिजमध्ये सस्पेन्स, कॉमेडी आणि ड्रामाचे असे सर्व एकत्र पाहायला मिळणार आहे. ट्रेलर लॉन्चच्या वेळी राजकुमार हिरानी यांनी सांगितले की, 'प्रीतम अँड पेड्रो'ची कथा सर्वात जास्त यासाठी आवडली, कारण यात दोन पूर्णपणे वेगवेगळ्या विचारसरणीच्या पात्रांमधील नाते अतिशय खास पद्धतीने दाखवण्यात आले आहे. या सीरिजची कथा गोव्याच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. कथेत एका बाजूला प्रीतम (वीर हिरानी) आहे, जो पूर्णपणे नवीन तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. प्रीतम हा जेनझी युगातला हॅकर आहे. तर दुसऱ्या बाजूला पेड्रो (अर्शद वारसी) क्राइम ब्रांच पोलिस अधिकारी आहे. जो जुन्या पद्धतीने काम करणारा आहे. या दोघांचे विचार आणि काम करण्याच्या पद्धतीत खूप फरक आहे. पेड्रोची अचानक क्राइम ब्रांचमधून सायबर क्राइममध्ये बदली होते. तेव्हा प्रीतम आणि पेड्रो एक केस सोडवण्यासाठी एकत्र येतात आणि इथूनच खरा खेळ सुरू होतो. या सीरिजची निर्मिती राजकुमार हिरानी यांनी केली असून, याचे दिग्दर्शन अविनाश अरुण यांनी केले आहे.

# भूमी पेडणेकरकडून सुशांत सिंहच्या आठवणींना उजाळा





अभिनेता सुशांत सिंह राजपूत याचे निधन होऊन 6 वर्ष पूर्ण झाली आहेत. त्याच्या पुण्यतिथीनिमित्त देशभरातील चाहत्यांकडून त्याला आदरांजली वाहिली जात आहे. अभिनेत्री भूमी पेडणेकरनेही सुशांतच्या आठवणींना उजाळा दिला. सुशांत आणि भूमी यांनी अभिषेक चौबे दिग्दर्शित 'सोनचिरीया' या चित्रपटात एकत्र काम केले होते. याच चित्रपटाच्या सेटवरील एक जुना फोटो शेअर करत भूमीने सुशांतसाठी एक अत्यंत भावुक पोस्ट लिहिली. भूमी पेडणेकरने 'सोनचिरीया' चित्रपटाच्या शीर्षक गीताच्या शुटिंगदरम्यानचा सुशांतसोबतचा एक सुंदर फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. हा फोटो पोस्ट करत तिने लिहिले, "मला तुझी खूप आठवण येते. काय अप्रतिम प्रतिभा, काय अद्भुत अभिनेता... सुशांत एक अत्यंत विचारशील व्यक्ती होता, जो तितकाच मनोरंजक, उत्साही आणि प्रतिभावान होता. हा फोटो 'सोनचिरीया'च्या टायटल ट्रॅकच्या शूट वेळचा आहे... या किती सुंदर आठवणी आहेत". भूमीची ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. भूमी पेडणेकर आणि सुशांत सिंह राजपूत यांचा 'सोनचिरीया' हा चित्रपट अभिनेत्याच्या निधनाच्या एक वर्ष आधी रिलीज झाला होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर जरी यशस्वी ठरला नसला, तरी समीक्षकांकडून या चित्रपटाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला होता. अभिनेत्याच्या निधनानंतर त्याचा शेवटचा चित्रपट 'दिल बेचारा' रिलीज झाला, जो थेट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करण्यात आला होता. ज्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. 'पवित्र रिश्ता' या मालिकेतून प्रचंड लोकप्रियता मिळाल्यानंतर त्याने चित्रपटांमध्ये पाऊल ठेवले आणि आपल्या १२ चित्रपटांच्या प्रवासातून त्याने चाहत्यांच्या मनात कायमचे घर केले.

# भारतीय क्रिकेटचा ट्रिपल धमाका!

## सकाळी १० ते रात्री उशिरापर्यंत क्रिकेटचा थरार; तीन भारतीय संघांची महत्त्वाची लढत

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**भारतीय क्रिकेट संघ यंदा एकाचवेळी विविध दौऱ्यांवर आहे. भारताचा वरिष्ठ पुरूष संघ घरच्या मैदानावर अफगाणिस्तानविरूद्ध वनडे मालिका खेळत आहे, तर भारत अ संघ श्रीलंका अफगाणिस्तानविरूद्ध तिरंगी मालिका श्रीलंकेत खेळत आहे. याशिवाय भारताला महिला वरिष्ठ संघ टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेसाठी इंग्लंडमध्ये आहे. हे तिन्ही संघ १७ जून रोजी सामने खेळणार आहे, हे सामने कधी कुठे आणि किती वाजता होणार हे जाणून घेऊया..**



बुधवार, १७ जून रोजी भारतीय संघाचे ३ सामने होणार आहेत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत क्रिकेटचा भरपूर थरार अनुभवता येईल. त्यामुळे, सर्व सामन्यांच्या वेळा नक्कीच नोंदवून ठेवा, जेणेकरून कोणताही सामना पाहण्यापासून हुकणार नाही. शिवाय हे सर्व सामने कुठे पाहता येणार, हेदेखील जाणून घेऊया.

तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील भारत अ संघ सध्या तिरंगी मालिकेसाठी श्रीलंकेत आहे. या मालिकेतील भारताचा अखेरचा साखळी सामना बुधवारी अफगाणिस्तानविरुद्ध होणार आहे. भारतीय संघाने आपल्या पहिल्या सामन्यात श्रीलंकेचा पराभव केला होता, परंतु त्यानंतर दुसऱ्या सामन्यात त्यांना अफगाणिस्तानकडून पराभव पत्करावा लागला. तिसऱ्या सामन्यात भारताचा पुन्हा एकदा श्रीलंकेशी सामना झाला; ५० षटकांचा हा सामना बरोबरीत सुटला, मात्र त्यानंतर झालेल्या 'सुपर ओव्हर'मध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला.

आता, जर संघाला या तिरंगी मालिकेतील अंतिम सामन्यात खेळायचं असेल, तर त्यांना अफगाणिस्तानचा पराभव करावा लागेल. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी १०:०० वाजता सुरू होईल. हा ५० षटकांचा एकदिवसीय सामना असल्याने, तो संध्याकाळी ६:०० च्या सुमारास संपण्याची शक्यता आहे. हा सामना सोनी लिव्ह ॲप आणि टीव्ही चॅनेलवर लाईव्ह पाहता येणार आहे.

भारत आणि अफगाणिस्तान वरिष्ठ संघांमध्ये वनडे मालिकेतील दुसरा सामना खेळवला जाणार आहे. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात सध्या तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे; पहिल्या सामन्यात भारतीय संघाने सहज विजय मिळवला. दुसरा सामना १७ जूनला दुपारी १.३० वाजता सुरू होणार आहे. शिवाय हा सामना जिओ हॉटस्टार ॲप आणि स्टार स्पोर्ट्स या चॅनेलवर लाईव्ह पाहता येईल.

### टी-२० वर्ल्डकप सामना कधी होणार?

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघ खेळत आहे. पहिल्याच सामन्यात पाकिस्तानचा धुव्वा उडवत भारताने विजयाने स्पर्धेला सूरूवात केली. आता भारताचा गट टप्प्यातील दुसरा सामना नेदरलँड्स संघाविरूद्ध होणार असून हा सामना संध्याकाळी ७ वाजता खेळवला जाईल.

# वर्ल्ड कपच्या तयारीसाठी कर्णधार शुभमन गिलचा 'मास्टर प्लॅन'

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात सध्या एकदिवसीय मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना धर्मशाळा येथे खेळवण्यात आला होता. या सामन्यात भारताने अफगाणिस्तानचा ७ गडी राखून पराभव करत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.**




पहिल्या सामन्यात भारतीय कर्णधार शुभमन गिलने शानदार खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. शनिवारी झालेल्या या सामन्यात भारताने सहज विजय मिळवत मालिकेची दमदार सुरुवात केली.

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय (ODI) मालिकेतील दुसरा सामना उद्या, १७ जून २०२६ रोजी खेळवला जाणार आहे. हा सामना लखनऊ येथील भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी एकाना क्रिकेट स्टेडियमवर दुपारी १:३० वाजता सुरू होईल.उद्याचा सामना जिंकून मालिका आपल्या नावावर करण्याचा टीम इंडियाचा प्रयत्न असेल.

मात्र, आता दुसऱ्या सामन्यात विजय मिळवून मालिका जिंकण्याइतकेच भारतीय संघाचे लक्ष आगामी एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीवर देखील असणार आहे. सामन्यापूर्वी भारतीय कर्णधार शुभमन गिलने संघाच्या तयारीबाबत मोठे वक्तव्य केले आहे. गिल म्हणाला की, आगामी विश्वचषक डोळ्यासमोर ठेवून संघ व्यवस्थापन सध्या वेगवेगळ्या खेळाडूंना संधी देत विविध कॉम्बिनेशनची चाचपणी करत आहे. "संघासाठी नेमकं काय सर्वोत्तम ठरतंय, हे समजून घेण्यावर आमचा फोकस आहे," असे गिलने सांगितले.

अफगाणिस्तानविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघात काही बदल पाहायला मिळू शकतात. अनुभवी फिरकीपटू कुलदीप यादवला संघात स्थान मिळण्याची शक्यता आहे. अलीकडच्या काळात त्याचा फॉर्म फारसा चांगला नसला तरी मधल्या षटकांमध्ये सामन्यावर नियंत्रण ठेवण्याची त्याची क्षमता लक्षात घेता त्याला संधी दिली जाऊ शकते. कुलदीपच्या आगमनामुळे हर्ष दुबेला संघाबाहेर बसावे लागू शकते. दुसरीकडे, युवा सलामीवीर यशस्वी जयस्वाललाही भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळण्याची शक्यता आहे. जर जयस्वालला संधी मिळाली तर इशान किशनला संघाबाहेर बसावे लागू शकते.

वेगवान गोलंदाजी विभागात पदार्पण करणाऱ्या गुरनूर ब्रारने पहिल्या सामन्यात शानदार कामगिरी केली होती. त्याने २७ धावांत ३ विकेट्स घेत भारतीय विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे त्याचे स्थान कायम राहण्याची शक्यता असून आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या प्रिन्स यादवला अजून काही काळ आपल्या संधीची वाट पाहावी लागू शकते.

दरम्यान, अफगाणिस्तानकडून पहिल्या सामन्यात रहमानुल्ला गुरबाजने शानदार शतक झळकावले होते. मात्र, त्याला इतर फलंदाजांची साथ मिळाली नाही. त्यामुळे मालिकेत पुनरागमन करण्यासाठी अफगाणिस्तानच्या फलंदाजांना सामूहिकरीत्या चांगली कामगिरी करावी लागणार आहे.

### भारतीय संघ

शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, यशस्वी जयस्वाल, केएल राहुल, श्रेयस अय्यर, हार्दिक पंड्या, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंग, हर्ष दुबे, इशान किशन, गुरनूर ब्रार, प्रिन्स यादव.

### अफगाणिस्तान संघ

हशमतुल्ला शाहिदी (कर्णधार), सेदीकुल्लाह अटल, रहमानुल्ला गुरबाज (यष्टिरक्षक), इक्रम अलीखिल (यष्टिरक्षक), अजमतुल्ला उमरझाई, बिलाल सामी, नांगेयालिया खरोती, फरीद अहमद मलिक, एएम गझनफर, मोहम्मद नबी, रशीद खान, दरविश शरीफ, दरविश रहमान आणि इब्राहिम झद्रान.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। बुधवार ।
दि. 17 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# उपचारादरम्यान महिलेचा विनयभंग केल्याचा आरोप; डॉक्टर अटकेत...

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल असलेल्या एका महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी चिंचवडमधील एका डॉक्टरला निगडी पोलिसांनी अटक केली आहे. स्टॉकिंग नीट करण्याच्या बहाण्याने महिलेच्या शरीराला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केल्याचा आरोप डॉक्टरवर करण्यात आला आहे. ही घटना रविवारी (दि. १४) पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास संभाजीनगर, चिंचवड येथील चेतना हॉस्पिटलमध्ये घडली.

याप्रकरणी ३७ वर्षीय महिलेने निगडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार डॉ. धैर्यशील शेटक (वय २७) याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला काही दिवसांपासून उपचारासाठी चेतना हॉस्पिटलमध्ये दाखल होत्या. त्यांच्यावर महिला वॉर्डमध्ये उपचार सुरू होते. रविवारी पहाटे आरोपी डॉक्टर वॉर्डमध्ये आला. उपचाराचा भाग असल्याचे सांगून त्याने महिलेच्या पायाला लावलेले स्टॉकिंग नीट करण्याचे कारण पुढे केले. त्यानंतर त्याने महिलेच्या मांडीला तसेच खासगी भागाला स्पर्श केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे महिला घाबरल्या असून त्यांनी तत्काळ याबाबत आक्षेप घेतला. त्यानंतर घडलेला प्रकार त्यांनी आपल्या नातेवाईकांना सांगितला. नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनाकडे याबाबत विचारणा केल्यानंतर महिलेने निगडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीची गंभीरता लक्षात घेऊन पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल केला. प्राथमिक चौकशीनंतर आरोपी डॉक्टरला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. घटनेच्या वेळी रुग्णालयातील परिस्थिती, उपस्थित कर्मचारी तसेच संबंधित नोंदींची पडताळणी पोलिसांकडून केली जात आहे.

दरम्यान, रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरवरच अशा प्रकारचा आरोप झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील विश्वासाच्या नात्याला धक्का देणारी ही घटना असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## रुग्णालयातील घटनेने खळबळ

उपचारासाठी दाखल असलेल्या महिलेने डॉक्टरविरोधात विनयभंगाची तक्रार दाखल केल्यानंतर निगडी पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली. रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील विश्वासाला तडा देणाऱ्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून रुग्णालयातील कर्मचारी व नोंदींची चौकशी सुरू आहे.





# वापरात नसलेल्या वस्तूंना नवे आयुष्य!

## महापालिकेच्या आर.आर.आर. केंद्रांना नागरिकांची वाढती पसंती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'आर.आर.आर. (रिड्यूस, रियूज, रिसायकल)' संकलन मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, गेल्या एका महिन्यात शहरातील विविध भागांतून ४५३ वस्तूंचे संकलन करण्यात आले आहे. या वस्तूंचे एकूण वजन ६२८.७५ किलो इतके असून, पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाला चालना मिळत आहे.**



महापालिकेच्या या उपक्रमांतर्गत नागरिकांनी घरातील वापरात नसलेल्या, मात्र पुनर्वापरयोग्य वस्तू स्वेच्छेने आर.आर.आर. केंद्रांवर जमा केल्या. यामध्ये खेळणी, पुस्तके, कपडे, इलेक्ट्रॉनिक साहित्य तसेच विविध घरगुती वस्तूंचा समावेश आहे. या वस्तूंचा पुनर्वापर होण्यास मदत होत असून, कचऱ्याचे प्रमाण कमी करण्याबरोबरच नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनालाही हातभार लागत आहे.

आर.आर.आर. उपक्रमाच्या माध्यमातून 'कमी वापरा, पुनर्वापर करा आणि पुनर्चक्रण करा' हा पर्यावरणपूरक संदेश नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत आहे. या उपक्रमामुळे वस्तूंचा सुयोग्य वापर, पुनर्वापराची सवय आणि कचरा कमी करण्याबाबत जनजागृती होत असून नागरिकांचा उत्स्फूर्त सहभागही वाढत आहे. पर्यावरण संरक्षणासोबतच शाश्वत विकासाच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले, आर.आर.आर. उपक्रमाला नागरिकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद हा पर्यावरण संवर्धनाबाबतची त्यांची जागरूकता दर्शवितो. पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरणाला प्रोत्साहन देत कचरा व्यवस्थापन अधिक परिणामकारक आणि शाश्वत करण्यासाठी महापालिका सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. नागरिकांचा हा सहभाग स्वच्छ, हरित आणि पर्यावरणपूरक शहर घडविण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

तर उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी नागरिकांना शहरातील आर.आर.आर. केंद्रांचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. घरातील वापरण्यायोग्य वस्तू या केंद्रांवर जमा करून पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीत सहभागी व्हावे, असे त्यांनी म्हटले आहे.



" पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरण ही केवळ स्वच्छतेची संकल्पना नसून ती वसुंधरा संरक्षणाची प्रभावी चळवळ आहे. आर.आर.आर. उपक्रमामुळे वापरात नसलेल्या वस्तूंना नवे आयुष्य मिळत आहे आणि कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यास मदत होत आहे. नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून 'कचऱ्यातून संसाधन' निर्माण करण्याच्या संकल्पनेला बळ द्यावे. स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत पिंपरी-चिंचवड घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाचे योगदान महत्त्वाचे आहे.

- **रवि लांडगे, महापौर.**

# लोकप्रतिनिधींचा विरोध डावलून पुनावळ्यातील शैक्षणिक भूखंड खासगी संस्थेच्या घशात!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुनावळे परिसरातील तब्बल ९१ गुंठ्यांचा शैक्षणिक आरक्षणाचा भूखंड खासगी संस्थेला देण्याचा निर्णय अखेर सत्ताधारी भाजपाने लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या तीव्र विरोधाला न जुमानता मंजूर केला. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत हा विषय मंजूर करण्यात आला असून, यामुळे पुनावळेकरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.**



" पुनावळेतील शैक्षणिक आरक्षणाचा भूखंड महापालिकेने स्वतःची शाळा उभारण्यासाठी वापरावा, ही आमची सुरुवातीपासूनची भूमिका होती. या मागणीला स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांनी पाठिंबा दिला. मात्र, सर्वांचा विरोध डावलून हा भूखंड खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेण्यात आला, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. महापालिकेकडे जागा, निधी आणि यंत्रणा असताना सर्वसामान्यांच्या मुलांसाठी शाळा उभारण्याऐवजी खासगी संस्थांच्या घशात सार्वजनिक मालमत्ता घालण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी केले आहे. हा निर्णय पुनावळेकरांच्या शैक्षणिक हक्कांवर घाला घालणारा असून, नागरिकांच्या भावनांचा अवमान करणारा आहे. याहून गंभीर बाब म्हणजे महापालिका सर्वसाधारण सभेचे लाईव्ह प्रक्षेपण बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लोकप्रतिनिधी सभागृहात काय भूमिका घेतात, कोण जनहिताचे प्रश्न मांडतो आणि कोण जनतेच्या विरोधात निर्णय घेतो, हे पाहण्याचा अधिकार नागरिकांना आहे. लाईव्ह प्रक्षेपण बंद करणे म्हणजे पारदर्शकतेवर पडदा टाकण्याचा प्रयत्न असून हा लोकशाहीचा खून आहे. जनतेपासून निर्णय प्रक्रिया लपविण्याचा हा प्रकार अत्यंत निषेधार्ह आहे. पिंपरी-चिंचवडकरांच्या हक्कांसाठी आणि पारदर्शक प्रशासनासाठी आम्ही हा लढा अधिक तीव्र करू. नागरिकांच्या हिताविरोधातील प्रत्येक निर्णयाला लोकशाही मार्गाने जाब विचारला जाईल.

- **सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.**

विशेष म्हणजे, हा भूखंड महापालिकेने स्वतःची शाळा उभारण्यासाठी वापरावा, अशी मागणी स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी आणि पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनने सातत्याने केली होती. मात्र, सर्व मागण्या धुडकावून लावत सत्ताधाऱ्यांनी खासगी शैक्षणिक संस्थेच्या बाजूने निर्णय घेतल्याचा आरोप होत आहे.

पुनावळे प्रभागाचे प्रतिनिधित्व करणारे नगरसेवक राहुल कलाटे, कुणाल वाव्हळकर, रेश्मा भुजबळ आणि श्रुती वाकडकर यांनी सभागृहात या प्रस्तावाला कडाडून विरोध केला. "महापालिकेने स्वतःची शाळा किंवा क्रीडांगण विकसित करावे. सर्वसामान्यांच्या मुलांसाठी ही जागा राखून ठेवावी," अशी भूमिका त्यांनी मांडली. मात्र, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मतालाही केराची टोपली दाखवत भाजपाने बहुमताच्या जोरावर विषय मंजूर केला.

पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनने सर्वप्रथम हा मुद्दा उचलून धरला होता. पुनावळ्यातील वाढती लोकसंख्या, शासकीय आणि परवडणाऱ्या शिक्षण संस्थांची कमतरता यामुळे हा भूखंड महापालिकेच्या शाळेसाठी वापरण्याची मागणी करण्यात आली होती. या भूमिकेला अनेक नागरिक संघटना आणि रहिवाशांनी पाठिंबा दिला होता.

सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्कापेक्षा खासगी संस्थांच्या हिताला प्राधान्य देण्यात आले. महापालिकेकडे जागा उपलब्ध असताना स्वतःची दर्जेदार शाळा उभारण्याऐवजी ती ३० वर्षांसाठी खासगी संस्थेला देण्याचा निर्णय हा जनहिताला हरताळ फासणारा आहे. सभागृहात अनेक सदस्यांनीही आरक्षणावरील भूखंड महापालिकेनेच विकसित करावा, गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सुविधा निर्माण कराव्यात, अशी भूमिका घेतली. तरीदेखील सत्ताधारी भाजपाने कोणतीही दखल न घेता प्रस्ताव मंजूर केल्याने लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिक आणि सोसायटी फेडरेशनच्या प्रतिनिधींनी आता या निर्णयाविरोधात व्यापक जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला असून, पुनावळेकरांच्या शैक्षणिक हक्कासाठी लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# सोसायट्यांच्या प्रश्नांवर सर्वसाधारण सभेत मौन

## ओला कचरा व्यवस्थापन व अमेनिटीजवरील कराच्या मुद्द्यावर नगरसेवक गप्प

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहरातील हजारो सोसायटीधारकांच्या दैनंदिन जीवनाशी आणि आर्थिक हिताशी संबंधित असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांवर नुकत्याच पार पडलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत कोणतीही ठोस चर्चा न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः ओला कचरा व्यवस्थापनाची सक्ती आणि सोसायट्यांच्या अमेनिटीजवर आकारण्यात येणाऱ्या कराच्या प्रश्नावर एकाही नगरसेवकाने प्रभावी भूमिका मांडली नसल्याचा आरोप सोसायटीधारकांकडून करण्यात येत आहे.**

महानगरपालिकेकडून घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ अंतर्गत येत्या १ जुलैपासून मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांनी आपल्या परिसरात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावणे बंधनकारक करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे शहरातील अनेक सोसायट्यांसमोर तांत्रिक, आर्थिक आणि जागेच्या उपलब्धतेसंबंधी प्रश्न निर्माण झाले आहेत. मात्र या अंमलबजावणीपूर्वी नागरिकांच्या अडचणी, आवश्यक सुविधा, अनुदान किंवा पर्यायी उपाययोजना याबाबत सभागृहात कोणतीही व्यापक चर्चा न झाल्याने सोसायटीधारकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

याशिवाय, सोसायट्यांमधील विविध अमेनिटीजवर आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कराच्या मुद्द्यानेही नागरिकांमध्ये चिंता निर्माण केली आहे. क्लब हाऊस, जिम्नॅशियम, स्विमिंग पूल, कम्युनिटी हॉल आणि इतर सामायिक सुविधांवर लावण्यात येणाऱ्या करामुळे रहिवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या विषयावर प्रशासनाकडून स्पष्टता मिळावी तसेच नागरिकांच्या हिताचा विचार करून निर्णय घ्यावा, अशी मागणी सातत्याने होत असतानाही सर्वसाधारण सभेत यावर कोणतीही ठोस भूमिका समोर आली नाही.

सोसायटी प्रतिनिधींच्या मते, ओला कचरा व्यवस्थापनाबाबत सक्तीची भूमिका घेण्यापूर्वी महापालिकेने आवश्यक यंत्रणा, तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. अनेक जुन्या आणि लहान जागेतील सोसायट्यांना स्वतंत्र प्रक्रिया प्रकल्प उभारणे व्यवहार्य नसल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे या विषयावर व्यापक जनसंवाद घडवून आणून व्यवहार्य धोरण जाहीर करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### संघटित लढ्याची भावना बळावली

लोकप्रतिनिधींकडून अपेक्षित पाठबळ मिळत नसल्याची भावना वाढत असल्याने आता सोसायटीधारकांनी स्वतः संघटित होऊन आपल्या प्रश्नांसाठी लढा उभारण्याची गरज असल्याचे मत विविध संघटनांमधून व्यक्त होत आहे. “गड्यांनो, आपली लढाई आपल्यालाच लढायची आहे,” असा सूर अनेक सोसायटीधारकांमध्ये उमटताना दिसत असून, आगामी काळात या प्रश्नांवर व्यापक जनआंदोलन उभारण्याबाबतही चर्चा सुरू असल्याची माहिती मिळत आहे.



“ नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या प्रश्नांवर लोकप्रतिनिधींनी भूमिका मांडणे अपेक्षित असताना सभागृहातील शांतता धक्कादायक आहे. ज्यांना आपण निवडून दिले, त्यांनाच आपल्या समस्यांबाबत काहीही देणंघेणं नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत आहे. ओला कचरा व्यवस्थापनाची सक्ती आणि अमेनिटीजवरील कर या विषयांवर प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने स्पष्ट भूमिका घ्यावी.

**- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन.**

### नागरिकांमध्ये संतापाची भावना

नागरिकांच्या जीवनाशी थेट संबंधित असलेल्या प्रश्नांवर लोकप्रतिनिधींनी सभागृहात ठाम भूमिका मांडणे अपेक्षित असताना दिसून आलेल्या शांततेमुळे नागरिकांमध्ये नाराजी आणि संतापाची भावना निर्माण झाली आहे. हजारो कुटुंबांवर परिणाम करणाऱ्या विषयांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत असून, लोकप्रतिनिधींनी तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# आय आय बी एम कॉलेज चिखली येथे हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चिखली येथील आय आय बी एम कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील डिग्री (TY) आणि डिप्लोमाच्या पासआऊट विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहात आणि आनंदमय वातावरणात संपन्न झाला. शिक्षण पूर्ण करून व्यावसायिक क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या, तसेच विविध नामांकित हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले.**



“ आयुष्यात तुम्ही कितीही मोठे व्हा, परदेशात उत्तुंग झेप घ्या, पण आपल्याला घडवणाऱ्या आपल्या आई-वडिलांना कधीही विसरू नका. वेळोवेळी आपल्या कॉलेजला भेट देऊन नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करा, सामाजिक कार्यात सहभाग घ्या आणि देशाचे नाव उज्ज्वल करा.

**- डॉ. धनंजय वर्णेकर, संस्थापक.**

या सोहळ्यात कॉलेजच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह (ट्रॉफी) देऊन गौरविण्यात आले. संस्थेने प्रवेशावेळी दिलेल्या आश्वासनानुसार, शिक्षण पूर्ण होण्याआधीच बहुतांश विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या नोकऱ्या मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी संस्थेविषयी अत्यंत अभिमान व कृतज्ञता व्यक्त केली. जे विद्यार्थी आगामी काळात उच्च शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी परदेशात जाणार आहेत, तसेच जे स्वतःचा व्यवसाय (बिझनेस) सुरू करणार आहेत, त्यांना यावेळी भविष्यातील विविध संधीं संदर्भात मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.

मनोगत व्यक्त करताना अनेक विद्यार्थी भावूक झाले होते. कॉलेजमधील जीवन, हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील त्यांचा प्रवेश आणि प्रत्येक कार्यक्रमाच्या आठवणींचा उल्लेख त्यांनी 'अविस्मरणीय क्षण' असा केला. "कॉलेजच्या या सुंदर आठवणी आमच्यासोबत आयुष्यभर कायम राहतील," अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

विद्यार्थ्यांनी आपल्याला या प्रवासात सातत्याने प्रोत्साहित केल्याबद्दल विभागप्रमुख श्री. अमोल भागवत सर, विभागप्रमुख कु. प्रतिक्षा डफळ मॅडम व एडमिन स्टाफचे विशेष कौतुक केले. तसेच हॉस्पिटॅलिटीसारखा आधुनिक अभ्यासक्रम अत्यंत सोप्या आणि दर्जेदार पद्धतीने शिकवल्याबद्दल विभागप्रमुख अनिकेत वंजारी सर, संदीप जाधव सर, एकता सिंग, गरिमा मलिक, मिलिंद तायडे आणि सर्व शिक्षकवर्गाचे मनापासून आभार मानले. कॉलेजच्या प्राचार्य मा. श्री. प्रदीप फुलकर सर यांनी लावलेली शिस्त आणि केलेले मार्गदर्शन भविष्यात नक्कीच उपयोगी पडेल, अशी कृतज्ञताही विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

शिक्षकवर्गानेही आपल्या भावना व्यक्त करताना, "तुम्ही सर्व विद्यार्थी आमच्या स्मरणात कायम राहाल," अशा शब्दांत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या.

हा निरोप समारंभ अत्यंत शिस्तबद्ध आणि सुंदर पद्धतीने पार पडला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रा. संदीप जाधव यांनी केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन शिक्षकवर्ग आणि एडमिन स्टाफने यशस्वीरित्या सांभाळले. विद्यार्थी, शिक्षक आणि व्यवस्थापनाच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा सोहळा सर्वांच्याच आठवणीत राहणारा ठरला.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway
Station